ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
*A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal*

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# महिला सक्षमीकरण आणि भारत

**विकास बाळासाहेब पावसे**[1], **शारदा बाळासाहेब पावसे**[2]

[1, 2] *संशोधक विद्यार्थी*

*Corresponding Author:* **विकास बाळासाहेब पावसे**

**DOI - 10.5281/zenodo.14875057**

***गोषवारा :***

*आधुनिक काळात महिला सक्षमीकरण हा विशेष चर्चेचा विषय आहे. स्रीयांमध्ये प्रचंड शक्ती असूनही तिच्या सक्षमीकरणाची नितांत गरज आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे त्यांचे आर्थिक निर्णय, उत्पन्न, मालमत्ता आणि इतर गोष्टींची उपलब्धता, या सुविधा मिळवूनच ते त्यांचा सामाजिक स्तर उंचावू शकतात. राष्ट्राच्या विकासात महिलांचे महत्त्व आणि अधिकार याबद्दल समाजात जागरुकता आणण्यासाठी मातृदिन, आंतरराष्ट्रीय महिला दिन असे अनेक कार्यक्रम साजरे केले जातात. भारतात महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी सर्वप्रथम त्या सर्व नकारात्मक विचारांना मारणे गरजेचे आहे जे समाजातील स्रियांचे हक्क आणि मूल्ये मारतात, जसे की हुंडा प्रथा, निरक्षरता, लैंगिक हिंसा, असमानता, भ्रूणहत्या, महिलांवरील घरगुती हिंसाचार, वेश्या व्यवसाय, मानवी तस्करी इ. आपल्या देशात लैंगिक असमानता मोठ्या प्रमाणात आहे. आजही महिलांना त्यांच्या कुटुंबाच्या तसेच बाहेरच्या समाजाच्या वाईट वर्तवणुकीचा प्रचंड त्रास होतो. भारतात निरक्षर महिलांची संख्या मोठी आहे. महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ तेव्हाच समजेल जेव्हा महिलांना चांगले शिक्षण दिले जाईल आणि त्यांना इतके सक्षम केले जाईल की त्या प्रत्येक क्षेत्रात स्वतंत्र होऊन निर्णय घेण्यास सक्षम होतील.*

***महत्वाचे शब्द : महिला सक्षमीकरण, कुटुंब, समाज, रूढी, परंपरा, आर्थिक-सामाजिक स्थिती, उद्योग***

**प्रस्तावना :**

भारतामध्ये स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी भूतकाळात तुरळक प्रयत्न झाले मात्र मागील काही दशकापासून अनेक सामाजिक संघटना, सरकारी तसेच बिगर-सरकारी संस्था यांनी स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. भारतात काही समाज सोडला तर सर्वसाधारणपणे महिलांची स्थिती अतिशय दयनीय आहे. भारतातील बहुसंख्य महिला स्त्री-पुरुष भेदभावाला सहज बळी पडतात. देशातील सामाजिक-सांस्कृतिक, धार्मिक श्रद्धा आणि प्रथा त्यांना त्यांच्या बेड्यांमध्ये अडकून ठेवतात त्यांना बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य देत नाहीत त्यामुळे त्या त्यांचे भवितव्य सुधारण्यासाठी साधन आणि संसाधने शोधत नाहीत. महिला सशक्तीकरण म्हणजे स्त्रियांना त्यांच्या परिस्थितीनुसार, कौटुंबिक स्थितीनुसार, त्यांच्यातील गुण आणि क्षमतांनुसार योग्य वाटेल त्या पद्धतीने त्यांचे स्वतःचे जीवन जगू देणे होय. भारतातील गेल्या दशकांतील परिस्थिती अगदी स्पष्टपणे प्रकट करते की, आदिवासी महिलांना अत्यंत गरिबी आणि भेदभावापासून ते भयंकर मानवी हक्कांच्या उल्लंघनापर्यंतच्या गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागत आहे कारण त्या आदिवासी आहेत आणि महिला असल्यामुळे त्या अनेक प्रकारच्या अत्याचारांना बळी पडत आहेत. त्यापैकी बहुसंख्य शेतकरी किंवा सर्वात शोषित वर्गातील कामगार आहेत. स्त्रिया म्हणून, त्यांना त्यांच्या स्वदेशी आणि मोठ्या प्रमाणात पितृसत्ताक समाजात दमनकारी पारंपारिक प्रथांचा सामना करावा लागतो. खाणकाम आणि वृक्षतोड, धरण बांधणी,

पर्यटन विकास प्रकल्प, औद्योगिक कृषी योजना इत्यादींच्या रूपात जागतिकीकरण आदिवासी लोकांच्या जमिनींवर वाढत जाणारे अतिक्रमण या सर्व गोष्टींचा त्यांच्या जीवनावर गंभीर परिणाम होत आहे. वडिलोपार्जित जमिनींपासून विस्थापित होणे, उदरनिर्वाहाच्या पारंपारिक साधनांपासून उपेक्षित होणे आणि स्थानिक समुदायांमध्ये वाढती गरिबी आणि यामुळे विशेषतः आदिवासी महिलांच्या कल्याणावर दूरगामी परिणाम होत आहेत.

**महिलांचे आर्थिक सक्षमीकरण:**

भारतात आजही महिलांना अनेक गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या महिला अनेक प्रकारच्या अत्याचारांना बळी पडतात. महिला म्हणून त्यांना दडपशाहीचा सामना करावा लागतो. खाणकाम, वृक्षतोड, धरण बांधणी, पर्यटन विकास प्रकल्प, औद्योगिक कृषी योजना इत्यादींच्या रूपात जागतिकीकरणामुळे लोकांच्या जमिनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढत आहे, ज्याचा त्यांच्या जीवनावर गंभीर परिणाम होतो. महिलांच्या कल्याणावर परिणाम होत आहेत. जागतिकीकरणाच्या युगात महिलांसाठी अभियांत्रिकी, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आयटी क्षेत्र, संगणक, इलेक्ट्रॉनिक आणि दळणवळण अशा अनेक क्षेत्रात संधी आहेत. देशामध्ये चांगल्या महिला उद्योजक देखील कार्यरत आहेत त्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करत आहेत. याबरोबरच व्यवस्थापन क्षेत्रातही कार्यरत आहेत. जागतिकीकरणामुळे अनेक नवीन क्षेत्रे उदयास आली आहेत आणि महिला सर्व उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. अनेक महिला नोकरी आणि व्यवसाय करण्यासाठी परदेशात जात असून त्या कोणतेही आव्हाने स्वीकारण्यास तयार आहेत हे महिलांच्या प्रगतीशील आणि गतिमान वृत्तीचे हे प्रतीक आहे. महिलांच्या प्रगतीला मारक ठरणाऱ्या रूढी, प्रथा, परंपरा बदलून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात घेऊन जातील असे नवे आणि आधुनिक कायदे विकसित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची वेळ आली आहे.

**भारतातील महिला सक्षमीकरणासाठी सरकारची भूमिका:**

भारतातील महिलांना सक्षम करनयासाठी सरकारच्या अनेक योजना आहेत. यातील अनेक योजना रोजगार, शेती आणि आरोग्य यासारख्या गोष्टींशी संबंधित आहेत. भारतीय महिलांची परिस्थिती लक्षात घेऊन या योजना तयार करण्यात आल्या आहेत. महिलांचा समाजातील सहभाग वाढावा यासाठी मनरेगा, सर्व शिक्षा अभियान, जननी सुरक्षा योजना इ. योजना तयार करण्यात आल्या आहेत. भारतीय समाजातील महिलांनाही पुरुषांप्रमाणेच प्रत्येक संधीचा लाभ मिळेल या हेतूने भारतीय महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला आणि बालविकास कल्याण मंत्रालय आणि भारत सरकार यांच्यामार्फत खालील योजना राबवल्या जात आहेत.

**१.बेटी बचाओ बेटी पढाओ योजना:**

सरकारने स्त्री भ्रूण हत्या आणि मुलींचे शिक्षण लक्षात घेऊन ही योजना तयार केली आहे. या योजनेच्या अंतर्गत मुलींच्या कल्याणासाठी नियोजन करून त्यांना आर्थिक मदत देऊन मुलींची ओझं समजणाऱ्यांची विचारसरणी बदलण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**२. महिला हेल्पलाइन योजना:**

महिला हेल्पलाइन योजना या योजनेंतर्गत महिलांना २४ तास आपत्कालीन सहाय्य सेवा पुरविली जाते. देशभरातील महिला १८१ या विहित क्रमांकावर डायल करून कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराची किंवा गुन्ह्याची तक्रार नोंद करू शकतात.

**३. उज्ज्वला योजना:**

महिलांची तस्करी आणि लैंगिक शोषणापासून संरक्षण करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. यासोबतच त्यांच्या पुनर्वसन आणि कल्याणासाठीही त्याअंतर्गत काम केले जाते.

**४. महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमास समर्थन (STEP):**

STEP योजनेंतर्गत महिलांचे कौशल्य वाढवण्याचे काम केले जाते जेणेकरून त्यांनाही रोजगार मिळू शकेल किंवा त्या स्वतःचा रोजगार सुरू करू शकतील. या कार्यक्रमांतर्गत महिलांना शेती, फलोत्पादन, हातमाग, टेलरिंग आणि मत्स्यव्यवसाय अशा विविध क्षेत्रात शिक्षण दिले जाते.

**५. महिला शक्ती केंद्र:**

महिला शक्ती केंद्र ही योजना ग्रामीण महिलांना सामुदायिक सहभागातून सक्षम करण्यावर भर देते. या अंतर्गत विद्यार्थी आणि व्यावसायिकांसारखे समुदाय स्वयंसेवक ग्रामीण महिलांना त्यांचे हक्क आणि कल्याणकारी योजनांची माहिती देतात.

**६. पंचायती राज योजनांमध्ये महिलांसाठी आरक्षण:**

सन २००९ मध्ये भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने पंचायती राज संस्थांमध्ये ५० टक्के महिला आरक्षणाची घोषणा केली यातून ग्रामीण भागातील महिलांची सामाजिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला जात आहे. ज्याद्वारे बिहार, झारखंड, ओरिसा आणि आंध्र प्रदेश तसेच इतर राज्यांमध्ये मोठ्या संख्येने महिला ग्रामपंचायत अध्यक्ष म्हणून निवडून आल्या आहेत.

**महिला सक्षमीकरणासाठी संसदेने पारित केलेले काही कायदे :**

भारतातील महिलांना कायदेशीर अधिकारांसह सक्षम करण्यासाठी संसदेने काही कायदेही पारित केले आहेत. ते कायदे पुढीलप्रमाणे आहेत -

१) अनैतिक वाहतूक (प्रतिबंध) कायदा १९५६

२) हुंडा बंदी कायदा १९६१

३) समान मोबदला कायदा १९७६

४) मेडिकल टर्मनेशन ऑफ प्रेग्नेंसी एक्ट १९८७

५) लिंग चाचणी तंत्र कायदा १९९४

६) बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६

७) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा २०१३

**राष्ट्र उभारणीत महिलांची भूमिका :**

अलीकडील बदलत्या काळात स्त्रियांना त्यांच्या अधिकारांची जाणीव झाली आहे आणि त्या स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ लागल्या आहेत. महिला घरातील उंबरठा ओलांडून देशासाठी महत्त्वाचे काम करत आहेत. आपल्या देशाच्या लोकसंख्येपैकी जवळपास निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. त्यामुळे राष्ट्र विकासाच्या महान कार्यात महिलांची भूमिका आणि योगदान पूर्णपणे आणि योग्य दृष्टीकोनातून ठेवूनच राष्ट्र उभारणीचे ध्येय साध्य करता येते.

**निष्कर्ष :**

२१ व्या शतकात भारतीय महिला जागतिकीकरण आणि उदारीकरणामुळे उद्भवलेली आव्हाने स्वीकारण्यास तयार आहेत. देशांतर्गत किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील नवनवीन आव्हाने स्वीकारण्यासाठी अधिकाधिक महिलांना प्रोत्साहित करणे ही काळाची गरज आहे. जागतिकीकरणातून उद्भवलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी महिलांना त्यांचे जीवन जगण्यासाठी स्वातंत्र्य दिले पाहिजे. महिलांना विकसित होण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे जेणेकरून त्या त्यांच्या क्षमतेचा योग्य वापर करू शकतील. अलीकडील काळात महिला डॉक्टर,

अभियंता, शास्त्रज्ञ, व्यवस्थापन अधिकारी आणि प्राध्यापक इत्यादी क्षेत्रात महिलांची संख्या लक्षणीय आहे. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली आव्हाने स्वीकारण्यासाठी आणि त्यांच्या संधींचा लाभ घेण्यासाठी महिलांनी पुढे येणे ही काळाची गरज आहे कारण स्व-विकासातूनच समाज आणि राष्ट्राच्या विकासाचा पाया घातला जाऊ शकतो त्यासाठी सर्व स्तरातील महिलांची भूमिका महत्त्वाची आहे.

**संदर्भ :**

१. Biju M.R.,Womens Empowerment, Mital Publication,2002
२. Pandey Vinita, Empowering Women in India : Changing Horizones,Mar.2005
३. Burange Rajesh, Empowerment of Women in India: Challenges and opportunities of Globalization, April 2012
४. www.wikipedia .com
५. www.maharashta.gov.in